0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

<u>वाचावे</u> :- १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून दिनांक १४/०२/२०१३ रोजी प्राप्त पत्र व त्यासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१२/२०१३/जा.१४९, दिनांक २५/०२/२०१३ व ०६/०३/२०१३.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०७/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजीचे अभिवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१२/२०१३/जा. ३४७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १७/०४/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## <u>आ दे श</u>

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**<u>प्रकरणाची पार्श्वभूमी</u> :-**

तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथील सहा पोलिस आयुक्त श्री. जगताप यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, दिनांक ०३/०२/२०१३ रोजी काही इसम हे तुर्भे पोलिस ठाणेचे हद्दीतील भुमीराज टॉवर, सेक्टर १६ सानपाडा भुमीराज टॉवर समोरील पामबिच रोडचे पश्चिमेकडील खाडी किनारी खारफुटीची झाडे असलेल्या व सदरचे ठिकाण वन विभागाचे ताब्यात असून सदर ठिकाणी प्रवेश करणे मनाई आहे हे माहित असताना तेथे लावण्यात आलेल्या लोखंडी गेटचे कुलूप डुब्लीकेट चावीने उघडून बेकायदेशिररित्या आत प्रवेश करुन मुंबई येथून होडीतून ऑईल व डिझेल असा माल समुद्रामार्गे आणून तुर्भे पोलिस ठाण्याचे हद्दीतील

वरील नमूद खाडी किनारी होडी थांबवून होडीतून आणलेला माल टेम्पोमध्ये असलेल्या ड्रममध्ये भरुन घेऊन जाणार आहेत; अशा मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सहा पोलिस आयुक्त श्री. जगताप यांच्यासह चालक पोशि/१२८२ चित्ते व आरटीपीसी पोना ६८७ कदम हे सरकारी वाहन क्र. एमएच-४३-जी-३६० मधून तुर्भे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भुमीराज टॉवर सेक्टर १६ सानपाडा समोरील पामबिच रोडचे पश्चिमेकडे असलेल्या खाडीमध्ये जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावरील उघड्या गेटमधून आत गेले. ती वेळ सुमारे पहाटे ०३:३० वाजताची होती. पोलिस पथक पुढे असलेल्या डांबरी रोडवरुन सुमारे १ किलो मीटर अंतर आत गेल्यावर त्यांचे समोरुन एक टेम्पो येत असताना पथकास दिसल्याने अधिकाऱ्यांनी सदर टेम्पो चालकास टेम्पो थांबविण्याचा इशारा केला असता, टेम्पो चालक याने टेम्पो थांबवून टेम्पोमधून उडी मारुन तेथील झाडी व अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. तसेच टेम्पोंचे डावे बाजूस बसलेला इसम सुध्दा टेम्पोंमधून उडी मारुन पळून जाण्याचा प्रयत्न करीत असता, त्यास पथकाने ताब्यात घेतले. त्यास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव विशाल सावंत असे असल्याचे सांगितले. पोलिस पथकाने टेम्पोची पाहणी केली असंता, सदर टेम्पोचा क्र. एमएच-०४-डीके-७६३ असून तो टाटा आयसर कंपनीचा आहे. तसेच अधिकाऱ्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या बॅटरीच्या उजेडाने टेम्पोमध्ये काय माल आहे, याबाबत तपासणी केली असता, टेम्पोमध्ये ठेवलेला पत्र्याच्या ड्रममध्ये ऑईल सदृश्य पदार्थ असल्याचे निदर्शनास आले. त्यावर अधिकाऱ्यांनी त्यांच्या ताब्यात असलेला इसम नामे विशाल सावंत यास ड्रममध्ये असलेल्या ऑईल सदृश्य पदार्थाबाबत विचारणा केली असता, त्याने एका ड्रममध्ये डिझेल व बाकीच्या इतर ड्रममध्ये ऑईल असल्याचे सांगितले. सदर वेळी, सपोआ श्री. जगताप यांनी सदर इसमांकडे सदर टेम्पो व टेम्पोमधील मालाबाबत विचारपुस केली असता, तो उडवाउडवीचे उत्तर देऊ लागला. तेव्हा सपोआ श्री. जगताप यांनी तुर्भे पोलिस ठाणे येथे संपर्क करुन रात्रपाळीसाठी असलेले पोलिस निरीक्षक आर. एन. जगताप यांना सदर ठिकाणी येण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे पोलिस निरीक्षक आर. एन. जगताप हे स्टाफसह सदर ठिकाणी आले. त्यानंतर सदर इसमास पुन्हा विचारपुस केली असता, त्याने सदरचा माल हा एका होडीतून खाडी किनारी आणून तो त्यांच्या ताब्यातील नमूद टेम्पोमधील ड्रममध्ये भरण्यात आला असल्याचे सांगितले. त्यास सदरचे ठिकाण व होडी दाखविण्यास सांगितले व टेम्पोजवळ तुर्भे पोलिस ठाण्याचे स्टाफ ठेवून पथक नमूद इसम विशाल सावंत यास सरकारी वाहनात बसवून खाडीमध्ये जाणाऱ्या रोडने सुमारे २ किलोमीटर अंतर आत गेले. तेव्हा सदर इसमाने ज्या ठिकाणी होडीतून माल टेम्पोमध्ये भरण्यात आला ते ठिकाण दाखविले. तेव्हा त्यास होडीबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, माल खाली झाल्यानंतर होडीतील माणसे होडी घेऊन निघून गेली आहेत.

त्यानंतर सदर इसम नामे विशाल यास टेम्पो चालक, टेम्पो मालक तसेच टेम्पोतील माल हा कोठून आणला व कोणत्या ठिकाणी नेण्यात येणार होता याबाबत पुन्हा विचारणा केली असता, त्याने माल आणलेली होडी ही हेमंत

CONTROLLER OF RATIONING

कोळी याचे मालकीची असून टेम्पो मालक मोहम्मद इलायस हा आहे. तसेच सदरचा माल आणणाऱ्या इसमाचे नाव अनवर असून माल घेणारा सलीम माझगाव व पुरण मिश्रा हे असल्याचे सांगितले. पोलिस पथक पुन्हा टेम्पो उभा केल्या ठिकाणी परत आले. सदर टेम्पो सुरक्षिततेसाठी पोलिस ठाणे येथे आणणे आवश्यक होते. परंतू सदर टेम्पोची चावी नसल्याने व तेथे अंधार व जंगल असल्याने सदरचा टेम्पो त्याच ठिकाणी उभा करुन तेथे पुरेसे सुरक्षा गार्ड नेमण्यात आले व ताब्यात असलेला इसम नामे विशाल सावंत यास अधिक चौकशी करीता अधिकाऱ्यांनी तुर्भे पोलिस ठाणे येथे आणण्यात आले.

तद्नंतर सकाळी ०८:०० वाजता सुर्योदय झाल्यानंतर दोन पंचासह परत टेम्पो उभा केल्या ठिकाणी पोलिस पथक पोहचले. सदर ठिकाणी नेमण्यात आलेले दोन पोलिस कर्मचारी हजर होते. त्यानंतर नमूद टेम्पोंची पोलिस अधिकाऱ्यांनी पंचासह पाहणी केली असता, टेम्पोचा क्र. एमएच-०४-डीके-७६३ असा असून टेम्पो टाटा आयसर कंपनीचा असल्याचे आढळून आले. सदर टेम्पोंचा रंग पिवळसर असून टेम्पोवर निळ्या रंगाची प्लास्टीकची ताडपत्री बांधलेली आहे. टेम्पोंच्या पुढील काचेवर इंग्रजी भाषेत LALLU असे लिहिलेले दिसत आहे, सदर टेम्पोचे केबिनमध्ये चढून पाहिले असता, ड्रायव्हरच्या सिटच्या बाजूस असलेल्या सिटवर सिल्वर रंगाची दोन कुलपे त्यावर Remi NAV-TAL- 7 LEVERS असे इंग्रजी भाषेत लिहलेले, चावीसह मिळून आले. त्यापैकी एका कुलूपावर कशानेतरी ठोकल्याने चेंबल्या सारखे दिसून आले. सोबतचे इसमास त्याबाबत विचारले असता, सदरची कुलूपे मेनरोडवरुन आत येताना असलेल्या लोखंडी गेटला लावण्यात आलेली कुलूपे असल्याचे त्याने सांगितले. ती पोलिस अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतली. सदर टेम्पोचे पाठीमागील प्लास्टीक ताडपत्री व झडप उघडून टेम्पोमध्ये चढून पाहिले असता, टेम्पोत एकूण २३ पत्र्याचे ड्रम असल्याचे दिसून आले. त्यातील सर्व ड्रमची झाकणे उघडून पाहिले असता, निळ्या रंगाच्या १२ व लाल रंगाच्या ५ अशा एकूण १७ ड्रममध्ये प्रत्येकी २०० लिटर ऑईल असलेले तसेच एका निळ्या ड्रममध्ये सुमारे १०० लिटर डिझेल व इतर ३ निळ्या रंगाचे व दोन लाला रंगाचे असे ५ ड्रम रिकामे असल्याचे दिसून आले. टेम्पोमधील प्रत्येक ड्रमला १ ते २३ असे अनुक्रमांक दिले. सदरच्या १८ ड्रममधून प्रत्यकी ३ प्लास्टीकच्या पांढऱ्या रंगाचे बाटलीमध्ये सुमारे २०० एमएल एवढे ऑईल/डिझेल नमुण्यासाठी काढून घेण्यात आले.

त्यानंतर सदर टेम्पोची चावी नसल्याने टोचन वाहन बोलावून सदर टेम्पो हा मालासह टोचन करुन तुर्भे पोलिस ठाणे येथे आणून गुन्ह्याचे तपासकामी जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मालाचे वर्णन खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टाटा आयसर कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ | १ | ४,००,०००/- |



DIRECTOR CIVIL SUPPLIES OFFICE MUMBAI

| | | | |
|---|---|---|---|
| २ | एकूण १७ ड्रम त्यात १२ निळ्या रंगाचे, ५ लाल रंगाचे ड्रम, प्रत्येक ड्रममध्ये प्रत्येकी २०० लिटर ऑईल भरलेले | ३४०० लिटर | १,५३,०००/- |
| ३ | एक ड्रम निळ्या रंगाचा त्यात सुमारे १०० लिटर डिझेल भरलेले | १०० लिटर | ६,०००/- |
| ४ | ५ रिकामे ड्रम त्यापैकी ३ निळ्या रंगाचे व दोन लाल रंगाचे | ५ नग | २,५००/- |
| ५ | दोन सिल्व्हर रंगाची NAVATAL कंपनीचे कुलूपे चावीसह | २ नग | १००/- |
| | एकूण | | ५,६१,६००/- |

अशाप्रकारे दिनांक ०३/०२/२०१३ रोजी ०३:३० वाजताचे सुमारास इसम नामे विशाल गुरुनाथ सावंत व त्याचे वर नमूद साथीदार यांनी आपसात संगणमत करुन सेक्टर १६ सानपाडा भुमीराज टॉवर समोरील पामबिच रोडचे पश्चिमेकडे असलेल्या खाडी किनारी असलेल्या खारफुटीचे झाडे असलेल्या व सदरचे ठिकाण हे वन विभागाचे ताब्यात असून तसेच सदर ठिकाणी प्रवेश करण्यास मनाई आहे, हे माहित असताना तेथे लावण्यात आलेल्या लोखंडी गेटचे कुलूप डुप्लीकेट चावीने उघडून बेकायदेशिररित्या आत प्रवेश करुन वरील वर्णनाचा जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे अंतर्गत येणारा माल हा होडीमधून सदर ठिकाणी आणून तेथून टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ मध्ये भरुन घेऊन जात असताना मिळून आल्याने, पर्यायानी त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४४७ व ३४ चा भंग केल्यावरुन तुर्भे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३८/२०१३ दिनांक ०३/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तद्नंतर दिनांक ०९/०२/२०१३ रोजी दोन पंचास पोलिस ठाण्यात बोलावून पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना सदर गुन्ह्याची माहिती समजावून सांगितली. सदर गुन्ह्यात अटक असलेला व समक्ष हजर असलेला इसम नामे अन्वर मदार सय्यद याने व पाहिजे आरोपी हेमंत नाखवा यांनी संगणमत करुन भाऊचा धक्का मुंबई येथून सदर गुन्ह्यात जप्त असलेला मुद्देमाल (ऑईल व डिझेल) बेकायदेशिररित्या त्यांचे स्वत:च्या मालकीचे असलेल्या दोन फायबर होड्यामधून टेम्पोमधील ड्रममध्ये भरुन बाहेर विक्री करणेसाठी व पाठविण्यासाठी तुर्भे पोलिस ठाण्याचे हद्दीतील सेक्टर १६ सानपाडा भुमीराज टॉवरचे समोर पामबीच रोडचे पश्चिमेस असलेल्या खाडी किनारी घेऊन आले. खाडी किनारी जाण्यासाठी असलेला रस्ता व सदरचे क्षेत्र हे वन विभागाच्या ताब्यात असून तेथे जाण्यास व प्रवेश करण्यास मनाई असताना तेथे असलेल्या लोखंडी गेटला लावलेली कुलुपे डुप्लीकेट चावीने उघडून वरील दोन्ही फायबर होड्यांमधून आणलेला माल टेम्पोमधील ड्रममध्ये भरल्यानंतर छापा मारुन जप्त करण्यात आलेला आहे. यातील समक्ष हजर असलेला अटक आरोपी अन्वर मदार सय्यद व पाहिजे आरोपी हेमंत नाखवा यांनी त्यांचे

मालकीच्या ज्या फायबर होड्यांमधून सदरचा बेकायदेशिर माल घेऊन त्या होड्या त्यांनी माल टेम्पोमधील ड्रममध्ये भरल्यानंतर पुन्हा घेऊन भाऊचा धक्का येथे उभा करुन ठेवल्या होत्या. सदरच्या होड्या यातील अटक आरोपी याने दाखविल्या त्या सदर गुन्ह्याचे तपासकामी जप्त करणेसाठी भाऊचा धक्का येथे उभ्या करुन ठेवल्या असलेल्या होड्या पाण्यातून चालवित घेऊन दिवाळे गांव, नवी मुंबई येथील जेटीवर आणल्या व तेथून हायड्राच्या मदतीने होड्या उचलून ट्रकमध्ये भरण्यात आल्या व तेथून तुर्भे पोलिस ठाणे येथे आणून होड्या ट्रकमधून हायड्राच्या मदतीने खाली उतरवून घेण्यात आल्या आहेत. सदर होड्या गुन्ह्याचे कामी पंचनामा करुन जप्त करण्यात आल्या. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | निळ्या रंगाची होडी तिला चारही बाजूने पुसट निळे व पांढरे पट्टे, इंजिन घर निळ्या रंगाचे, होडीला सर्व बाजूने कापलेल्या टायरच्या पट्ट्या खिळे मारुन लावलेल्या व टायर लावलेले जुनी वापरती | १ नग | २,७५,०००/- |
| २ | निळ्या रंगाची होडी तिला चारही बाजूने पुसट निळे व पांढरे पट्टे, इंजिन घर निळ्या रंगाचे, होडीला सर्व बाजूने कापलेल्या टायरच्या पट्ट्या खिळे मारुन लावलेल्या व टायर लावलेले जुनी वापरती | १ नग | २,००,०००/- |
| | **एकूण** | | ४,७५,०००/- |

अशाप्रकारे प्रस्तूत गुन्ह्यात घटनास्थळी नमूद टेम्पो व त्यामधील विविध ड्रममधील ऑईल/डिझेलचा साठा इ. तसेच तद्नंतर जप्त केलेल्या दोन होड्या असा मिळून एकूण १०,३६,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी वाचावे क्रमांक १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०५/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १२/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... IBAI

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. आर.एन. जगताप हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस पुरवठादार अनवर मदार सय्यद, विशाल गुरुनाथ सावंत व खरेदीदार सलीम, माझगाव हे उपस्थित राहिले. परंतू त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी यांनी सदर प्रकरणी उर्वरीत आरोपी हे अद्याप फरार असल्याचे सांगितले. तसेच तपासामध्ये जप्त बोटीच्या मालकांबाबतही अद्याप माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. जप्त मुद्देमालापैकी डिझेल/ऑईलचा साठा हा तस्करी मार्गाने आणलेला असल्याने तसेच सदरच्या अवैध साठ्याची तस्करीकरीता जप्त बोटींचा अवैध वाहतुकीसाठी वापर केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे, असे सांगितले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तीवाद</u> :-

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. आर.एन. जगताप यांनी युक्तीवाद केला की, सदर गुन्ह्याचा तपास चालु असून सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी १) हेमंत नाखवा (होडी मालक), २) मोहम्मद इलायस (टेम्पो मालक), ३) पुरण मिश्रा (माल घेणारा) यांना नमुद गुन्ह्यात अटक करावयाचे आहे. यातील पाहिजे आरोपी क्र. १ यांचेकडून गुन्ह्यातील जप्त माल ऑईल व डिझेल हे आरोपीत यांनी कोठून व कोणत्याप्रकारे प्राप्त केले. तसेच पाहिजे आरोपी क्र. ३ याचेकडून सदर गुन्ह्यातील जप्त ऑईल व डिझेल कोणास विकणार होते, याबाबत तपास करणे बाकी आहे. सदर गुन्ह्यातील सर्व जप्त मुद्देमाल तुर्भे पोलिस ठाण्यात जमा आहे. तसेच जप्त मालामधील टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ यामध्ये १७ ड्रममध्ये ऑईल व एक ड्रम डिझेल भरलेले आहे. तरी सदरचा जप्त मुद्देमाल हा ज्वलनशील स्वरुपाचा असल्याने अधिक काळ पोलिस ठाण्यात ठेवणे धोक्याचे आहे. यातील अटक आरोपीतांनी सदर गुन्ह्यातील जप्त माल ऑईल व डिझेल हे बेकायदेशीर समुद्र मार्गाने आणल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, सदरचा मुद्देमाल हा यातील आरोपीतांना देण्यात येऊ नये असे पोलिसांचे मत आहे. तसेच सदर गुन्ह्यातील जप्त माल आणणेसाठी वापरलेल्या होड्या व मालवाहतुकीसाठी वापरलेला वरील क्रमाकांचा टेम्पो हा यातील आरोपीतांना परत केल्यास ते त्याचा उपयोग पुन्हा अशाप्रकारे माल आणणेसाठी वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे जप्त होड्या व टेम्पो यातील आरोपीतांना परत देण्यात येऊ नये असे पोलिसांचे स्पष्ट मत आहे व सदर जप्त मुद्देमाल, होड्या व टेम्पो याबाबत आपणास असलेल्या अधिकारान्वये योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

CONTROLLER OF RATIONING HEAD MU

निष्कर्ष :-

मी वरील प्रस्तुत प्रकरणातील पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०३/०२/२०१३ रोजी तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथील सहा पोलिस आयुक्त श्री. जगताप यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त झालेल्या माहितीनुसार तेथील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ०३:३० वाजताचे सुमारास इसम नामे विशाल गुरुनाथ सावंत व त्याचे वर नमूद साथीदार यांनी आपसात संगणमत करुन सेक्टर १६ सानपाडा भुमीराज टॉवर समोरील पामबिच रोडचे पश्चिमेकडे असलेल्या खाडी किनारी असलेल्या खारफुटीचे झाडे असलेल्या व सदरचे ठिकाण हे वन विभागाचे ताब्यात असून तसेच सदर ठिकाणी प्रवेश करण्यास मनाई आहे, हे माहित असताना तेथे लावण्यात आलेल्या लोखंडी गेटचे कुलूप डुप्लीकेट चावीने उघडून बेकायदेशिररित्या आत प्रवेश करुन जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे अंतर्गत येणारा माल हा होडीमधून सदर ठिकाणी आणून तेथून टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ मध्ये भरुन घेऊन जात असताना मिळून आल्याने, संबंधितांविरुध्द तुर्भे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३८/२०१३ दिनांक ०३/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन नमूद टेम्पो व त्यामधील विविध ड्रममधील ऑईल/डिझेलचा साठा इ. तसेच तद्नंतर जप्त केलेल्या दोन होड्या असा मिळून एकूण १०,३६,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी, तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. आर.एन. जगताप यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यातील जप्त माल ऑईल व डिझेल हे आरोपीत यांनी बेकायदेशीररित्या समुद्र मार्गाने आणल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, सदरचा मुद्देमाल हा यातील आरोपीतांना देण्यात येऊ नये असे सांगितले. तसेच सदर गुन्ह्यातील जप्त माल आणणेसाठी वापरलेल्या होड्या व मालवाहतुकीसाठी वापरलेला टेम्पो हा यातील आरोपीतांना परत केल्यास ते त्याचा उपयोग पुन्हा अशाप्रकारे माल आणणेसाठी वापरण्याची शक्यता आहे. सदरचा जप्त मुद्देमाल हा ज्वलनशील स्वरुपाचा असल्याने अधिक काळ पोलिस ठाण्यात ठेवणे धोक्याचे आहे. त्यामुळे जप्त होड्या व टेम्पो यातील आरोपीतांना परत देण्यात येऊ नये असे सांगुन सदर जप्त मुद्देमाल, होड्या व टेम्पो याबाबत आपणास असलेल्या अधिकारान्वये योग्य ते आदेश होणेस विनंती केली आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीसाठी ठेवण्यात आलेल्या सुनावणीस सर्व संबंधितांना पाचारण करण्यात आले. तथापी, अन्वर मदार सय्यद, विशाल गुरुनाथ सावंत व सलीम माझगांव या आरोपींव्यतिरीक्त उर्वरीत आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. अथवा जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कोणीही दावा केला नाही. यावरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त साठ्यासंदर्भात

आरोपीतांना काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येत आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी आरोपीतांनी आपआपसात संगनमत करुन मुंबई येथील खोल समुद्रामधुन डिझेल व ऑईलचा साठा बेकायदेशीररित्या हस्तगत करुन त्याची जप्त दोन्ही होडींमध्ये अवैध साठवणुक व वाहतुक करुन सदरचा पेट्रोलियम पदार्थाचा साठा घटनास्थळी जप्त केलेल्या टेंम्पोमध्ये विनापरवाना तसेच अवैध विक्री करण्याकरीता घेऊन जात असतांना पोलिसांनी रंगेहाथ पकडल्याचे निष्पन्न होत असल्याने सदर पेट्रोलियम द्रवपदार्थाचा संपुर्ण अवैध साठा हा पृथ:करण अहवालाच्या अधिन राहुन शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, जप्त दोन्ही होडींच्या मालकांना सुनावणीस पाचारण करुनही त्यांच्यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत अथवा जप्त होडीच्या मालकीचा दावा केला नाही अथवा होडीच्या मालकीसंबंधीचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सुनावणीच्यावेळी सादर केले नाहीत. सदर गुन्हयातील आरोपीतांनी संगनमत करुन जप्त दोन्ही होडींचा वापर बेकायदेशीररित्या मिळविलेले डिझेल व ऑईलच्या साठयाची विनापरवाना खरेदी करुन साठवणूक करण्याकरीता केले असल्याचे सिध्द झाले आहे. यावरुन नमुद गुन्हयातील आरोपीतांनी संगनमत करुन तस्करीमार्गाने विनापरवाना व बेकायदेशीररित्या मिळविलेल्या डिझेल व काळे तेलाची अवैध वाहतूक, साठवणूक व विक्री करण्याकरीता सदर होडींचा गैरवापर केला असल्याचे सिध्द होत आहे. प्रकरणी, सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांना सदरच्या नोंदणीकृत नसलेल्या अथवा विनापुरावादर्शक कागदपत्रे असलेल्या दोन्ही होडी प्रत्येकी बाजारमुल्याएवढी रक्कम भरुन होडीच्या मालकांस परत दिल्यास ते सदर दोन्ही होडींचा तस्करी कारवाईमध्ये पुन्हा गैरवापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, जप्त करण्यात आलेल्या निळया रंगाच्या दोन्ही होडींची जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी, पोलिस पथकाने घटनास्थळी जप्त केलेले टेंम्पो क्रमांक एमएच-०४-डीके-७६३ हा टेंम्पो परत मिळण्यास कोणीही दावा केलेला नाही. तथापी, सदर धाडीत उपरोक्त जप्त केलेल्या टेंम्पोचा बेकायदेशिररित्या हस्तगत केलेल्या डिझेल व ऑईलच्या साठयाची अवैध वाहतुक व व्यवसायाकरीता उपयोग केला असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टेंम्पोच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेंम्पोचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेंम्पो त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टेंम्पोचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टेंम्पो जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३८/२०१३ दिनांक ०३/०२/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले प्रत्येकी २०० लिटर मापाचे १७ ड्रममधील ३४०० लिटर ऑईल व १ ड्रममधील १०० लिटर डिझेल असे मिळून एकुण ३५०० लिटर पेट्रोलियम पदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

२) जप्त करण्यात आलेल्या २ निळया रंगाच्या होडया शासनजमा करण्यात याव्यात. सदर होडयांची पोलिसांनी जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेला आयसर कंपनीचा टेंम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ हे वाहन शासनजमा करण्यात यावे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनाचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेचे रिकामे होणारे १८ ड्रम तसेच ५ रिकामे ड्रम असे एकुण २३ ड्रम व २ सिल्व्हर रंगाची नवताल कंपनीचे चावीसह कुलपे इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0010

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) विशाल गुरुनाथ सावंत
२) टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ चा मालक मोहम्मद इलायस
३) टेम्पो क्र. एमएच-०४-डीके-७६३ चा चालक
४) हेमंत नाखवा
५) अनवर मदार सय्यद, पुरवठादार
६) सलीम माझगाव, खरेदीदार
७) पुरण मिश्रा, खरेदीदार,
८) दोन्ही होडीचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.